क्रमांक १२/२-ड/एक-२४४
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
पी. एम. आर. डी. ए. इमारत, २रा मजला,
वांद्रा [पूर्व], मुंबई ४०० ०५१.

दिनांक :- १५/८/१९९५

प्रति,

श्री. विनोद चेत शिर्के.............
मुख्य प्रवर्तक,
किनारा
..........सहकारी गृहनिर्माण
संस्था [मर्यादित]
३/१ अलका को.ऑ.हौ.सोसायटी
व्ही.केन. पूरव रोड चुनाभट्टी मुंबई ४०० ०२२.

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा

मौजे-मरोळ, स.नं. १६१ लगतची
खाडी जमीन अभिन्यास भाग क्रमांक
..७-ब...मधील भूखंड क्रमांक .१...
.किनारा. सहकारी गृहनिर्माण संस्थेला
[नियोजित]. प्रदान करण्याबाबत...

संदर्भ :-१] शासन, महसूल व वन विभागाकडील
अ] निर्णय क्रमांक एलसीएस-१०८२/१८८२
प्र.क्र. २२२/ग-४ दिनांक १२.५.१९८३
ब] निर्णय क्रमांक एलसीएस-१०९२/प्र.क्र. १७५/
ग-१ दिनांक १८.१२.१९९२
२] संस्थेचा अर्ज दिनांक .११-१-१९९४.
३] मुंबई महानगर पालिकेचे पत्र क्रमांक ड/
डी.एस. २/एल.ओ.जे. डब्ल्यू एन/
दिनांक २९.७.१९९३

महाशय,

दिनांक २३.७.१९९४ रोजी काढलेल्या सोडतीमध्ये आपली संस्था यशस्वी झाल्यामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे-मरोळ, तालुका-अंधेरी येथील स.नं. १६१ खाडी लगतची जमीन अभिन्यास क्रमांक ...७-ब....... मधील भूखंड क्रमांक ...१.....चे क्षेत्र ..९०७.६७.....चौ.मी. व रस्त्यात जाणाऱ्या जागेचा अतिरिक्त चटई निर्देशांक इत्यादीमुळे देय होणारे क्षेत्र ४८४.०८...चौ.मी. असे एकूण १.३९१.७५.. चौ.मी. क्षेत्र आपल्या नियोजित .किनारा........सहकारी

...२/-

गृहनिर्माण संस्थेला तिच्या सोबत जोडपत्र एक मध्ये ज्यांची नांवे नमूद केली आहेत त्या सदस्यांची रहाण्याची व्यवस्था करण्यासाठी/सदनिका बांधण्याकरीता संदर्भाधिन क्रमांक १(अ) मधील दिनांक १२.५.१९८३ चे शासनातील तरतुदीनुसार तसेच संदर्भाधिन क्रमांक २ दिनांक २९.७.१९९३ च्या मुंबई महानगर पालिकेचे पत्र यांत दर्शविलेल्या अटी व शर्ती आणि खालील अतिरिक्त अटीवर जमीन प्रदान करण्याचा हेतू आहे.

१] संदर्भाधिन क्रमांक १ (ब) मधील दिनांक १८.१२.१९९२ च्या शासन निर्णयामधील तरतुदीप्रमाणे प्रश्नाधीन जमीनीची तात्पुरती बाजार भावाची किंमत रुपये .४४०/-.. प्रती चौ.मी. मानून सवलतीची तात्पुरती कब्जा हक्काची रक्कम रुपये ५,३४,३०४/- [illegible] ...] हे पत्र मिळाल्यापासून एक महिन्याचे आंत या कार्यालयात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा [Collector B.S.D.] या नांवाने डिमांड ड्राफ्टने भरावी.
सदर तात्पुरती सवलतीची कब्जाहक्काची रक्कम ही संस्थेला जमीनीचा ताबा देण्यासाठी अडचण निर्माण होऊ नये म्हणून संपूर्ण क्षेत्रावर निवासी प्रयोजनाची सवलतीची तात्पुरती कब्जाहक्काची रक्कम आहे. त्याचा मेळ अंतिम मुल्यांकनाचे वेळी घेण्यात येईल. त्याकरिता संस्थेने रुपये २०/- चे मुद्रांकित पेपरवर खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करावे. सदर हमीपत्र नोटरी समोर सही केलेले असावे.

"आता ठरविण्यात आलेली तात्पुरती कब्जाहक्काची रक्कम व अंतिम मुल्यांकन ठरविण्यात आल्यावर जर तात्पुरत्या कब्जाहक्काची किंमत अंतिम कब्जेहक्काच्या रक्कमेपेक्षा कमी असल्याचे आढळले तर तात्पुरती रक्कम व अंतिम रक्कम यातील फरकाची रक्कम जमीनीचा ताबा दिल्यापासून प्रचलित दरानुसार होणाऱ्या १५% व्याजाच्या रक्कमेसह संस्थेकडून वसूल करण्यात येईल. सदरची रक्कम तत्संबंधीची सूचना मिळाल्यापासून एक रकमी, एक महिन्याचे आत भरण्यात येईल. हे संस्थेला मान्य व बंधनकारक आहे."

२] संस्थेने जमीनीचा ताबा घेण्यापूर्वी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कायद्यातंर्गत नोंदणी केल्याचा दाखला या कार्यालयाला सादर करावा.

३] जमीन प्रदानासाठी शासनाकडून ठरविण्यात आलेल्या अटी व शर्ती कबुल असल्याबाबतचा करारनामा करण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलविण्यात येईल तेव्हा या कार्यालयात हजर राहून सह्या कराव्यात [सोबत करारनाम्याची प्रत जोडली आहे.] तिच्या ६ प्रती लेजरपेपरवर टंकलिखीत करुन पाठवाव्यात.

४] संस्थेने वास्तुकारणीची निवड केलेल्या ठरावाची प्रत या कार्यालयाला सादर करावी.

५] संस्था नोंदणीकृत करणे, करारनामा करणे इत्यादी करीता आणखी काही कालावधी लागणार असल्यामुळे संस्था वरील भूखंडाला सर्वबाजूनि कुंपण घालण्यास तयार असल्यास खालील नमुन्यांत रुपये २०/- चे मुद्रांकित पेपरवर हमीपत्र [नोटरी समोर सही केलेले] या कार्यालयाला सादर केल्यावर संस्थेला सदर भूखंडाला कुंपण घालण्यास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

...३/-

Scanned by CamScanner

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र.१२/१३/एस-१८४
दिनांक १५/ ४ /१९८५ रोजीची किनारा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) च्या मंजूर सभासदांची यादी.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | व्यवसाय/नोकरी | सरासरी मासिक उत्पन्न रुपये. |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | श्री.विवेक संभाजी शिंदे | नोकरी | रु.१४६९.०० |
| २. | श्री.वसिष्ट राजय्या बेल्लोरी | -"- | रु.२११०.०० |
| ३. | श्री.संतोष शशिकांत जाधव | -"- | " २११०.०० |
| ४. | श्री.दत्ता राजाराम जाधव | -"- | " २११०.०० |
| ५. | श्री.दिपक श्रीकृष्ण शेरे | -"- | " २८५६.०० |
| ६. | श्री.राजेंद्र बाबुराव पगारे (अनुसूचित जाती) | -"- | " २११०.०० |
| ७. | श्री.रविंद्र नारायण गाणेकर | -"- | " २११०.०० |
| ८. | श्री.नारायण राजाराम बरंडेकर | -"- | " ७५२२.०० |
| ९. | श्रीमती प्रभा प्रमोद प्रभू | -"- | " ४४००=०० |
| १०. | कुमारी रेखा निवृत्ती वाघमारे (अनुसूचितजाती) | -"- | " २६६०.०० |
| ११. | श्री.विनायक जगन्नाथ पेठणेकर | -"- | " २००१.०० |

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता.

मीएसआरपी.१४४९५.

Scanned by CamScanner